# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

दिनांक: 14 फेब्रुवारी २०१७

प्रति,

मा श्री रोहन राठोड
मुंबई मनपा प्रभाग क्र ६८
भारतीय जनता पार्टी उमेदवार

**विषय : सरदार वल्लभ भाई पटेल नगर म्हाडा वसाहतीमधील नागरिकांच्या प्रातिनिधिक मागण्या**

महोदय,

**नगरसेवक पदाच्या ह्या निवडणुकीत आपणास उदंड यश लाभो.**

आपल्या प्रभागातील सरदार वल्लभभाई पटेल नगर हि एक प्रमुख वसाहत आहे ज्यामधून अदमासे साडेतीन हजार कुटुंब राहत आहेत. सदर असोसिएशन हे नगरातील जनसामान्यांचे प्रतिनिधित्व करत असते. ह्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगरातील व्यक्तींसमवेत चर्चा केली असता, नवीन निवडून येणाऱ्या नगरसेवकांकडून काही प्रातिनिधिक मागण्या कळलेल्या आहेत त्या सादर निवेदनातून आपणास पोहोचवत आहोत.

नगरात आजमितीस सर्व संस्थांना पुरेसा पाणी पुरवठा होत आहे, पण **पाणी येण्याची रात्रौ १० वाजेची वेळ मात्र अडचणीची ठरत आहे**. परिणामी पाणीपुरवठा सकाळच्या सत्रात व्हावा, अशी तमाम गृहिणीवर्गाची आग्रहाची मागणी आहे. पाणीपुरवठ्याच्या वेळेवर आधारित घरातील कामांची आणि शाळेत जाणाऱ्या मुलांसह नोकरीस जाणाऱ्या कुटुंब प्रमुखाची जीवनशैली झालेली आहे परिणामी सकाळी पाणीपुरवठा झाल्यास बरे होईल.

**घन कचरा व्यवस्थापनेकरिता येणाऱ्या कचरागाड्यांच्या अनियमिततेमुळे संस्थांच्या प्रवेशद्वारावर ठेवण्यात आलेले कचरा डवे एक दोन दिवसाआड ओसंडून वाहत असतात.** ह्या कचरागाड्यांच्या ठेकेदारांचा संपर्क क्रमांक सर्व संस्थांना देऊन कचरा उचलण्याच्या कामात नियमितता आणली गेली पाहिजे. सदर वसाहत हि येणाऱ्या कालखंडात पुनर्विकासात होऊन येथे राहणाऱ्या कुटुंबांची संख्याही तिपटीने वाढणार आहे. अशा परिस्तिथीत कचराही मोठ्या प्रमाणात तयार होणार हे ओघाने आलेच. **मोठ्या प्रमाणात तयार होणाऱ्या कचऱ्यावर स्थानिक पातळीवरच काही प्रमाणात प्रक्रिया करून त्याची विल्हेवाट लावण्याकरिता एफ्फ्लुएंट ट्रीटमेंट प्लांट उभारला जावा अशी नागरिकांची मागणी आहे.**

आजच्या काळात ऊर्जेची मागणी हि सातत्याने वाढत आहे. ऊर्जेची बचत म्हणजेच ऊर्जेची निर्मिती असे नेहमी सांगितले जाते पण राजकीय पातळीवर मात्र त्याबाबत उदासीनताच दिसून येते. सदर वसाहतीमध्ये रात्रौ करिता विजेचे खांब आणि मोठे हाय मास्ट उभारण्यात आलेले आहेत. त्यांचे वीज वापरापोटी येणारे देयक हे काही लाखांच्या घरात असते. सौर ऊर्जेचा पर्याय स्वस्तात उपलब्ध असताना महानगर पालिकेचा महसूल वीज देयकात



Scanned with CamScanner

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

खर्ची घालण्यापेक्षा सौर ऊर्जेतून आधारित प्रकाश योजना अमलात यावी अशी मागणी आम्ही करत आहोत. ज्या प्रमाणे इमारत प्रस्ताव विभाग नवीन **इमारतीच्या बांधकामास बी सी सी देण्याअगोदर रेन वॉटर हार्वेस्टिंग सक्तीचे करते त्याच धर्तीवर नवीन विकसित इमारतींच्या आवारातील दिवे हे सौरऊर्जेवर चालवले गेले पाहिजेत असा दंडक करण्यात यावा.**

नगरातील रस्त्यांचा दर्जा उत्तम आहे परंतु ह्या **रस्त्यांवर दुतर्फा होणारे पार्किंग आणि सामान्य नागरिकास त्यामुळे पदपथाचा वापर करण्याऐवजी रस्त्यावरून चालावयास लागणे** दर दिवशी वाद आणि अंपघात घडवीत असतात परिणामी मोकळे पदपथ नागरिकांस उपलब्ध व्हावेत अशी नागरिकांची मागणी आहे.

**संस्था क्र ६० ते नवीन उच्च उत्पन्न म्हाडा वसाहत याना जोडणारा रास्ता खुला करण्यात यावा** जेणेकरून लोखंडवाला आदर्श नगर जाणाऱ्या नागरिकांना सोयीचे होऊन एक नवीन सुविधा उपलब्ध होईल.

एव्हड्या मोठ्या वसाहतीमधील जनतेची सोया लक्षात घेऊन म्हाडाने सोयी सुविधा भूखंड उपलब्ध करून दिले आहेत. त्यामधील **बाजाराकरिता आरक्षित भूखंडावर** एक्सलंसीं हि उच्च उत्पन्न गटाची सहकारी गृहनिर्माण संस्था उभारली असून नियमाप्रमाणे गाळ्यांचे बांधकाम होऊन सदर गाळे तसेच पडून आहेत. ह्या गाळ्यांमधून **लवकरात लवकर बाजार सुरु** होऊन स्थानिक नागरिकांची ४ बंगला मंडईत जाण्याची परवड थांबविण्यात यावी अशी मागणी नागरिकांच्या वतीने आम्ही करीत आहोत.

तसेच नगरच्या आजुबाजुस असणाऱ्या **झोपडपट्टीतील अनधिकृत बांधकामांवर** आपण **कारवाई** करून नकारात्मक गोष्टींवर आळा घालण्यात यावा. जेणेकरून समाजकंटक नियंत्रणात राहतील.

अजूनही अनेक बाबी आहेत परंतु त्यापैकी महत्वाच्या अशाच मागण्या आपणापर्यंत पोहोचावीत आहेत कारण आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात त्याचा उल्लेख झालेला दिसला नाही.

**तेव्हा आमच्या सार्वत्रिक पण न्याय मागण्यांची आपण दखल ठेवावी हि विनंती .**

**येणाऱ्या निवडणुकीत आपणास भरघोस मत मिळोत अशी शुभेच्छा !**

स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन

| आनंद जाधव | सुर्यकांत ननावरे | अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |



Scanned with CamScanner